गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३७ वा ● रविवार २३ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 37 | Date : 23/06/2024 blow Sunday Page 4 Price 4

# पेपरफुटी साठी केंद्राकडून कठोर कायदा


## दहा वर्षांचा कारावास ते १ कोटीच्या दंडाची तरतूद!

### नीट परीक्षा रद्द

**५ मे रोजी झालेली यूजीसी नेट परीक्षा १८ जून रोजी रात्री उशिरा रद्द करण्यात आली. ही परीक्षा पुन्हा एकदा नव्याने घेतली जाणार आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने परिपत्रक काढत यासंदर्भातील निर्णय जाहीर केला. पेपर फुटल्याचा संशय असल्याने तसेच या परीक्षेची पारदर्शकता आणि पावित्र्य सुनिश्चित करण्यासाठी ही परीक्षा रद्द करण्यात आल्याचं शिक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलं.**

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) पेपर लीकप्रकरणी देशभर गदारोळ झाल्यानंतर केंद्र सरकारने शुक्रवारी एका कठोर कायद्याची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनियमितता रोखता येणार आहे. शुक्रवारी (२१ जून) रात्रीपासून लागू झालेल्या या कायद्यात गुन्हेगारांना कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.




परीक्षा प्राधिकरण, सेवा पुरवठादार किंवा इतर कोणत्याही संस्थेसह एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींच्या गटाने संघटित गुन्हा केल्यास, त्यांना पाच वर्षांपेक्षा कमी नसलेल्या परंतु दहा वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि दंड १ कोटी रुपयांची तरतूद या कायद्यात नमूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC), स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC), रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) द्वारे घेतलेल्या सार्वजनिक परीक्षांमध्ये अन्यायकारक मार्ग रोखणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

या वर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेने सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मंजूर केला होता. या कायद्यात फसवणुकीला आळा घालण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यांमध्ये | **पान २ वर**

# महाराष्ट्रासह तीन राज्यांत लवकरच विधानसभेचे वेध



**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता केंद्रीय निवडणूक आयोग विधानसभा निवडणुकांच्या तयारीला लागले आहे. यावर्षी महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीर या ठिकाणी विधानसभा निवडणूक घेतली जाणार आहे. त्या दृष्टीने आता निवडणूक आयोगाने काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. निवडणूक आयोगाने निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे.

घरोघरी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राच्या काही अडचणी असतील, त्या दूर केल्या जाणार आहेत. या निवडणुकांची तयारी म्हणून नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. तुम्ही जर आतापर्यंत मतदार म्हणून तुमची नोंदणी केली नसेल तर ती तातडीने करून घ्या, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

२५ जूनपासून म्हणजेच येत्या चार दिवसांपासून महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू काश्मीर या ठिकाणी | **पान २ वर**

# पेट्रोल डिझेल भरताना घ्या काळजी, अन्यथा तुमच्याबरोबरही होऊ शकते 'अशी' फसवणूक

**सोलापूर/महेश गायकवाड**

पेट्रोल डिझेल भरताना काळजी घेतली जाणे गरजेचे आहे अन्यथा तुमच्याबरोबरही फसवणूक होऊ शकते ' त्यामुळें इंधन पेट्रोल किंवा डिझेल भरताना ते राऊंड फिगर च्या रक्कमेत भरण्यात यावे. आजकाल खाण्याच्या गोष्टींपासून प्रत्येक गोष्टीत आपल्या भेसळ नाही तर फसवणूक होताना दिसते. अगदी तेल, दूध, साबणापासून ते ब्रँड वस्तूमध्येही ग्राहकांना सर्रासपणे फसवले जाते. पदार्थामध्ये भेसळ करुन, वजनात घट करुन, कमी किंमतीची वस्तू जास्त विकून किंवा मोठ्या ब्रँडच्या नावाच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक केले जाते. ज्यामुळे ग्राहकांचे काहीवेळी हजारो किंवा लाखोंचे आर्थिक नुकसान होते. अशातच आता फसवणूकीचा एक नवा प्रकार समोर आला आहे. जो पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल आणि डिझेल भरणाऱ्या ग्राहकांबरोबर होताना दिसत आहे. पेट्रोल पंपावर फ्यूल मीटरमध्ये छेडछाड करून शॉर्ट फ्युलिंगद्वारे लोकांबरोबर स्कॅम केल्याच्या अनेक घटना आत्तपर्यंत समोर आल्यात. त्यामुळे वाहन चालकांनी पेट्रोल पंपावर पेट्रोल किंवा डिझेल भरताना जरा सावध रहा. तसेच खालील दिलेल्या गोष्टींची काळजी घ्या.



**वाहनात इंधन भरताना मीटरकडे लक्ष द्या** पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल किंवा डिझेल भरताना मीटरवर लक्ष ठेवा. जेव्हा तुम्ही पेट्रोल भरता तेव्हा २०० रुपये, ४०० रुपये किंवा १००० रुपये या राउंड फिगरच्या रकमेऐवजी पाच-दहा रुपये वाढवा किंवा कमी करा. यामागील कारण म्हणजे काही पंपावरील मशिन्स चुकीच्या पद्धतीने लावल्या जातात, ज्यामुळे तुमच्या वाहनात कमी इंधन भरले जाते आणि वाहन चालकांची फसवणूक केली जाते.

**इंधनाच्या डेंसिटीवर लक्ष ठेवा** जेव्हा तुम्ही तुमच्या कार किंवा बाईकमध्ये पेट्रोल भरता तेव्हा मीटरमध्ये त्या इंधनाची डेंसिटी देखील तपासा. ही डेंसिटी पेट्रोलसाठी ७३० ते ८०० किलो प्रति क्यूबीक मीटर आणि डिझेलसाठी ८३० ते ९०० किलो क्यूबीक मीटर असावी. जर पेट्रोलची डेंसिटी ७३० युनिटपेक्षा कमी असेल तर याचा अर्थ पेट्रोलमध्ये भेसळ झाली आहे. त्याचवेळी डिझेलची डेंसिटी ८३० युनिटपेक्षा कमी असल्याचे दिसल्यास त्यात भेसळ असल्याचे निश्चित होते.

**फ्यूल मीटरवर किंमत पाहा** फ्यूल मीटरमध्ये प्राइज सेक्शनकडे लक्ष देणे देखील महत्त्वाचे आहे. मीटरमध्ये इंधन भरताना किंमतीत ३ ते ४ रुपयांची वाढ झालेली दिसेल, पण ही एक सामान्य गोष्ट आहे. पण जर तुम्हाला किंमतीत १० किंवा २० रुपयांची वाढ दिसत असेल तर समजा मीटरमध्ये छेडछाड झाली आहे. अशी फसवणूक टाळण्यासाठी दक्ष राहण्याची गरज आहे. तुम्ही सावध न राहिल्यास तुमची फसवणूक होऊ शकते.

# आषाढी यात्रेतील सर्व कामे वेळेत पूर्ण करून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा मिळणार

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती...



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा बुधवार दिनांक १७ जुलै, २०२४ रोजी संपन्न होणार असून, या दिवशी पहाटे २.२० वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात येणार आहे. या यात्रेच्या अनुषंगाने सर्व कामे वेळेत पूर्ण करून भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

दिनांक २२ जून रोजी सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समितीची सभा श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. या सभेस सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी गुरू किसनगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर, ड माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड व सर्व खात्याचे विभाग प्रमुख उपस्थित होते. याशिवाय, शासकीय महापूजेवेळी गाभाऱ्यातील | **पान २ वर**



# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ०५ लाख ४० हजार किंमतीचे चांदी वस्तू अर्पण

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

गुजरात येथील भाविक श्री तेजसकुमार मगनभाई पटेल यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस ५ किलो वजनाची चांदी वस्तू अर्पण केले आहेत. त्याची किंमत रू.५,४०,०००/- इतकी आहे.यावेळी मंदिर समितीच्या वतीने श्री पटेल यांचा सत्कार मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब, विभाग प्रमुख कुलकर्णी उपस्थित होते.

# सिंदखेड राजा तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींचे सचिव भ्रष्ट ?

## विस्तार अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती देण्यास टाळाटाळ !

## रामचंद्र किसन साळवे यांची उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार

**बुलढाणा / राहुल साबळे**

सिंदखेड राजा तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींचे सचिव भ्रष्ट असल्याचा आरोप मौजे सुरा येथील रामचंद्र किसन साळवे यांनी केला आहे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागून देखील त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याने त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे सिंदखेड राजा तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय मोहाडी अंतर्गत १५ व्या वित्त




आयोगाच्या कोणकोणत्या कामावर किती निधी खर्च करण्यात आला व कामाच्या अंदाजपत्रकास लागून आलेला १८%च व १२ % जी. एस. टी भरणा केलेल्या पावत्या व व्हाऊचर्सच्या प्रमाणित प्रती मागितल्या होत्या पण ६ महिने उलटून देखील जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी माहिती दिली नाही त्यामुळे विस्तार अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी पंचायत समिच सिंदखेड राजा यांच्याकडे अपील करण्यात आली होती तसेच ग्रामपंचायत मोहाडी,शेंदूरजन, शिंदी, पोफळ शिवणी , राजेगावं, लिंगा . पांग्रीकाटे बाळसमुद्र, वरोडी, सायाळा,पिंपळखुटा.पिंपळगाव कुडा, ग्रामपंचायत कार्यालयास प्रथम अपिलीय अधिकारी तथा | **पान २ वर**

# आषाढीवारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संबधित विभागांनी सर्व कामे ५ जुलै पर्यत पुर्ण करावीत : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या यात्रेसाठी पायी पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पालखी सोहळ्यासोबत येणा-या वारकरी भाविकांना पालखी मार्गावर व तळांवर तसेच यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात व परिसरात सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांना कोणतीही अडचण येऊ याची दक्षता घेवून संबधित विभागांनी सर्व कामे दि.५ जुलै पर्यत पुर्ण करावीत अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिल्या.

आषाढी पार्श्र्वभूमीवर श्री रुक्मिणी मंदीर देवस्थान व जिल्हा प्रशासनासोबत ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सूचना दिल्या. यावेळी ऑनलाईन बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्यकार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदीर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, प्रांताधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाणे, सां.बा. कार्यकारी अभियंता अमित निंबकर, अक्षय महाराज भोसले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे श्री घोडके, सुनिल उंबरे तसेच संबधित विभागाचे अधिकारी उस्थित होते.




यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, प्रत्येक शासकीय विभागांनी परस्परात समन्वय ठेवून आषाढीवारी निमित्त त्यांच्या विभागामार्फत करण्यात येणारी सर्व कामे विहति कालावधीत पुर्ण करावीत. वारकरी भाविकांना पालखी मार्गावर, रिंगण सोहळा व प्रदक्षिणा मार्गावर भाविकांना खडी टोचणार नाही याची दक्षता घ्यावी. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गाची वेळेत करावीत. स्वच्छता कर्मचाऱ्यांना रेनकोटसह सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यात यावा. वारी कालावधीत पावसाळा असल्याने डास होण्याची शक्यता असून नगरपालिकेने डास प्रतिबंध उपाययोजना कराव्यात. शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. भाविकांच्या सुरक्षेसाठी महावितरण व नगरपालिका प्रशासनाने विद्युत साक्षरता व जनजागृती मोहीम राबवावी. आरोग्य विभागाने खाजगी हॉस्पिटल मध्ये राखीव बेडची उपलब्धता ठेवावी. तसेच आयसीयू बेडची संख्या वाढवावी. पालखी मार्गावर महिला कक्ष, चेंजिंग रूम, सॅनिटरी नॅपकिन आदी व्यवस्थितेची | **पान २ वर**

# संपादकीय

## सामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे

यंदाचा पर्जन्यकाळ समाधानकारक असल्याचे भाकीत वर्तवले गेले आहे. या संपूर्ण हंगामात १०५ टक्के पाऊस पडेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे पाऊस योग्य वेळी पडेल आणि शेतकरी समाधानी असतील, या अपेक्षेनेच आगामी पर्जन्यकाळाकडे पाहू या. अर्थात अलीकडे पाऊसही भरवशाचा राहिलेला नाही. गेल्या काही वर्षांचा अंदाज तर त्याचा लहरीपणाच दाखवून देतो. त्यातच कमी कालावधीमध्ये पडणारा प्रचंड पाऊस ही अलीकडची मोठी समस्या ठरत आहे. असा अतिरेकी पाऊस पाणवठ्यांमधील जलसाठा वाढवत नाहीच, पण दुसरीकडे त्याच्या प्रभावामुळे जमिनींमध्ये अतिरिक्त पाणी साचल्याने पिकांचे नुकसान होते. हणजेच कुठे अतिवृष्टी तर कुठे प्रचंड पावसात जुन्या इमारती कोसळल्याने होणारी जीवित आणि वित्तहानी, तर कुठे रेल्वे-लोकल यंत्रणा पाण्याखाली गेल्यामुळे होणारी प्रवाशांची फरफट अशी एक ना अनेक प्रकारची संकटे या काळालाही चिंताग्रस्त करतात. कोणतीही पूर्वसूचना न देता धरणांमधील पाणी सोडल्यामुळे, नद्या-ओढ्यांना पूर आल्यामुळे लोकांच्या घरात पाणी शिरून होणारे नुकसान, त्यामुळे गुराढोरांच्या जीविताला असणारा धोकाही अशा संकटांचे गांभीर्य वाढवतो. दरडी कोसळून बघता बघता गावे ढिगाऱ्याखाली दबण्याच्या वाढत्या घटनाही मन हेलावून टाकणाऱ्या असतात. पर्जन्यकाळाचा हाच बदलता आणि काहीसा धास्तावणारा ट्रेंड लक्षात घेता सुरुवातीपासून नियोजनाची गरज लक्षात घेणे गरजेचे आहे. पावसामुळे दुष्काळ संपेल, अशी आशा असते. खरे तर दुष्काळाचे खापर निसर्गावर फोडण्यात काहीच अर्थ नाही. पाऊस कमी पडला म्हणून दुष्काळ पडला, असे समजणेच चुकीचे आहे. याचे कारण सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला तरी तो आपली गरज भागावी इतका नक्कीच असतो. किंबहुना, तो गरजेच्या तिप्पट पडतो. म्हणूनच गरज आहे ती उपलब्ध पाण्याच्या काटेकोर वापराची. आपल्याकडे अनेक जिल्हे दुष्काळी भाग म्हणून ओळखले जातात. मात्र, काही गावांनी दुष्काळी स्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी हजारो बोअरवेल्स घेतल्या आहेत. त्याद्वारे कधीही काढले न गेलेले भूस्तरातील पाणी काढल्यास त्याच्या आधारे शेतीक्षेत्रात विविध पिकांचे उत्पादन घेणे शक्य होईल. हे उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठेत जाईल. साहजिक तेथील पाणीही बाजारपेठेकडे नेता येईल. याच पध्दतीने पाण्याची निर्यात वाढवणे शक्य होईल. मुख्य म्हणजे ही सारी माहिती जल साक्षरतेच्या माध्यमातून सामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

# आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व : डॉ.डी.टी.गायकवाड



महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मुलं मंत्र अंगीकृत करून प्रतिकुल परिस्थितीचा सामना करत करत आपले उच्चा शिक्षण पूर्ण करून नोकरी, व्यवसायात प्रावीण्य मिळवत आपल्या कुटुंबातील जबाबदारी संपूर्णपणे पार पाडत आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवून चळवळीतील कार्यकर्त्यांना बौद्धिक पातळीवर प्रेरणा देणार व्यक्तीमत्व म्हणजे डॉ.डी.टी.गायकवाड होय असं म्हंटले तर ते वावगे ठरणार नाही.

डॉ.डी.टी.गायकवाड यांनी बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरित होऊन आपला संघर्षमय जीवन प्रवास चालू ठेवला आहे.ते शासकीय नोकरीत असतांना व आता सेवा निवृत्ती नंतर ही सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यामध्ये गोर गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असेल किंवा त्यांचा सन्मान असेल,सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देणे त्यांचा सन्मान करणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रबोधनाचे कार्यक्रम घेणेआदी उपक्रम राबविले व राबवित आहेत.विशेष करून आपल्या मुळ गावी आष्टा कासार ता.लोहारा या गावी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची बुध्द मूर्ती थायलंड येथून घेऊन गावात बुद्ध रूपाची प्रतिष्ठापना करून एक आगळा वेगळा इतिहास त्यांनी घडविलाआहे.एवढ्यारच न थांबता त्यांनी विविध गाव बुद्ध रुप दान करून खेड्यात ग्रामीण भागात धम्म चळवळ गतीमान करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. आपल्या सम्यक अजिवीकेतुन बुध्द रूप दान देणारे,तसेच माणुस मरू शकतो पण त्यांचे विचार मरू शकत नाही या विचारांतुन २०ते २५ विविध विषयांवर पुस्तके लिहून आपला इतिहास पुस्तकांच्या माध्यमातून जीवंत ठेवणारे डॉ.डी.टी.गायकवाड ग्रामीण भागात आंबेडकरी साहित्य संमेलन भरवून नवोदित साहित्यिकांना कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्याचे त्यांना सदैव बुध्द,फुले,शाहू आंबेडकरी विचाराचे बौद्धिक खुराक देण्यासाठी जाणिव पुर्वक प्रयत्न करतात.

आंबेडकरी चळवळीत सतत सक्रिय असणारे,एक अभ्यासू त्यागी,शिलवान, गुणवान,ज्ञानी,सदाचारी,नीतिवंत, आदर्शवादी निस्वार्थी प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय डॉ.डी.टी.गायकवाड सर होय.

दि.२१जून हा त्यांचा जन्म दिवस आहे.त्याच्या जन्म दिनाच्या निमित्ताने त्यांना खूप खूप शुभेच्छा.त्यना निरोगी आयुष्य लाभो त्यांच्या इच्छा आकांक्षा पुर्णतांवास जावो,हिच तथागत भगवान बुद्ध चरणी सदिच्छा त्यांच्या नेतृत्वाखाली धम्माची सेवा घडत राहो.पुनश्र्च एकदा त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**-एस.के.गायकवाड, मु.पो.वागदरी ता.तुळजापूर**

# पुणे येथे उपोषणकर्त्यांची राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने घेतली भेट

## शिष्टमंडळासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर ॲड.मंगेश ससाणे यांचे उपोषण मागे




**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ओबीसी आरक्षण बचाव मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात उपोषणकर्ते ड. मंगेश ससाणे यांची अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आज राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. शिष्टमंडळासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले.यावेळी ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, उद्योग मंत्री उदय सामंत, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे आदी उपस्थित होते.

भुजबळ म्हणाले, उपोषणकर्त्यांच्या विविध मागण्यांबाबत २१ जून रोजी सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली आहे. बैठकीत विविध मागण्यासंदर्भात सविस्तर सकारात्मक चर्चा होऊन, काही मागण्यांबाबात निर्णय घेण्यात आले आहेत तर काही मागण्यांसंदर्भात सकारात्मक विचार सुरू आहे.ी. महाजन म्हणाले, येत्या काळात होणाऱ्या अधिवेशनादरम्यान सर्वपक्षीय बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कसलाही धक्का लागणार नाही, कुणावरही अन्याय होणार नाही. उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती श्री. महाजन यांनी केली.शिष्टमंडळाने उपोषणकर्त्यांच्या तब्येतीचीही विचारपूस केली. ड. ससाणे आपल्या मागण्यांच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार योगेश टिळेकर, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे-देवकाते, पुणे शहरचे तहसीलदार सूर्यकांत येवले आदी उपस्थित होते.


# हायटेक इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन साजरा



**उमरगा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

योगा दिनाचे औचित्य साधून उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील हायटेक इंग्लिश स्कूल येथे योगाचे महत्त्व सांगून विद्यार्थी व शिक्षकांना योगाचे प्रशिक्षण देण्यात आले.

येणेगुर येथील हायटेक इंग्लिश स्कूलमध्ये २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सरस्वती मोरे यांची उपस्थिती होती .यावेळी महालिंगरायवाडीचे योगाशिक्षक बालाजी खंडागळे व त्यांची मुले अजिंक्य खंडागळे व गणेश खंडागळे यांनी इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात शाळेतील विद्यार्थी व शिक्षकाकडून योगासन पूर्व हालचाली उभे राहून योगासने, बसून पाटीवर व पोटावरील विविध योगासने व प्राणायमाचे प्रात्यक्षिके करून मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी, शिक्षक यानी योगा प्रशिक्षणास उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. योगाशिक्षक बालाजी खंडागळे यांनी योगाचे व प्राणायमचे महत्व विशद केले.सांस्कृतिक विभाग प्रमुख स्मिता पोतदार यांच्यासह सर्व सहकारी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.




पान १ वरुन

## पेपरफुटी साठी केंद्राकडून..

सहभागी असलेल्यांना पाच ते दहा वर्षांचा तुरुंगवास आणि किमान शिक्षेची तरतूद आहे. तसंच एक कोटी रुपयांच्या दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याची अंमलबजावणी शुक्रवारी मध्यरात्रीच करण्यात आली.

६ फेब्रुवारी रोजी लोकसभेत आणि ९ फेब्रुवारी रोजी राज्यसभेत हा कायदा पारीत झाला होता. तर, २१ जून रोजी मध्यरात्रीपासून या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका लीक करणे, परीक्षेदरम्यान उमेदवारांना बेकायदा मदत करणे, संगणक नेटवर्क किंवा संसाधनांशी छेडछाड करणे, बोगस उमेदवार परीक्षेला बसवणे, बनावट परीक्षा आयोजित करणे किंवा बनावट कागदपत्रे जारी करणे आणि गुणवत्तेसाठी कागदपत्रांशी छेडछाड करणे याविरोधात या कायद्यात शिक्षा आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. कायद्यांतर्गत येणारे गुन्हे अजामीनपात्र आहेत. पोलीस उपअधीक्षक किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त पदापेक्षा कमी दर्जाचा कोणताही अधिकारी या कायद्यान्वये कोणत्याही गुन्ह्याचा तपास करू शकतो. याव्यतिरिक्त, केंद्र सरकारला कोणताही तपास केंद्रीय एजन्सीकडे पाठविण्याचा अधिकार आहे.

शिक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यूजीसी नेट परीक्षा रद्द केली. तसेच ही परीक्षा पुन्हा नव्याने घेतली जाणार आहे. नव्याने घेतली जाणारी ही परीक्षा नेमकी कधी होईल, यासंदर्भात लवकर निर्णय जाहीर करण्यात येईल. याबरोबरच या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला असून पेपर लीक प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल असंही शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलं आहे. याप्रकरणात जी कुणी व्यक्ती दोषी असेल, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही शिक्षण मंत्रालयाने स्ष्ट केलं आहे.

## महाराष्ट्रासह तीन राज्यांत

निवडणुकीच्या आधीची तयारी सुरू होणार आहे. पोलिंग स्टेशन्स, मतदारांचे समूह यांची चाचपणी केली जाणार आहे. असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ६४.२ कोटी मतदारांनी मतदान केले आहे. या निवडणुकीत एकूण ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले आहे. एक नजर महाराष्ट्रातील राजकीय चित्रावर राज्यात गेल्या काही वर्षात घडलेला राजकीय घडामोडीनंतर झालेले सत्तांतर आणि शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर एक विचित्र अवस्था तयार झाली आहे. याचा लोकसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला मोठा फटका बसला आहे. ४५ प्लसचा दावा करणाऱ्या महायुतीला केवळ १७ जागांवर यश मिळाले. तर महाविकास आघाडीने ३० जागा जिंकल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. लोकसभेत ज्याप्रमाणे लोकांनी भाजपला नाकारले तसेच चित्र विधानसभेतही दिसेल, असा दावा मविआच्या नेत्यांकडून होत आहे. दुसरीकडे भाजपसह महायुतीनेही आम्ही चांगली कामगिरी करू असा दावा करत आम्हीच पुन्हा सत्तेत येऊ असे म्हटले आहे.

## आषाढी यात्रेतील सर्व कामे वेळेत..

उपस्थितांच्या संख्येबाबत जिल्हा प्रशासनाचे अभिप्राय घेणे, गाभा-यातील तसेच विठ्ठल सभामंडप, बाजीराव पडसाळी येथील सर्व कामे ३० जून पूर्वी पूर्ण करणे, मंदिर समितीच्या सन २०२४-२०२५ च्या ७६ कोटीच्या अंदाजपत्रकास मंजुरी, मंदिर समितीच्या जमिनी खंडाने देणेबाबत लिलाव प्रक्रिया राबविणे, निर्माल्यपासून अगरबत्ती व धुप तयार करणे इत्यादी निर्णय सभेत घेण्यात आले. तसेच १५ व्या वित्त आयोग अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिराकरीता श्री संत ज्ञानेश्र्वर दर्शनमंडप व श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे मोफत जागा उपलब्ध करून देण्याचे ठरले. त्यामुळे भाविकांना व नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## सिंदखेड राजा तालुक्यातील १२

विस्तार अधिकारी यांनी सुनावणी करून जोडपत्र-अ मधील सर्व माहिती १० दिवसात विनाशुल्क देण्याचे आदेश वरील सर्व ग्रामपंचायतींना दिले होते त्यांनी दिलेल्या आदेशानुसार सदरच्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना रामचंद्र किसन साळवे यांनी प्रत्यक्ष भेटून माहिती मागितली तरी माहिती दिली गेली नाही त्यामुळे त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे आता या १० ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांवर काय कार्यवाही होते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे व मोठा भ्रष्टाचार बाहेर येण्याची शक्यता देखील नाकारता येणार नाही

## आषाढीवारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर

उपलब्धता ठेवावी. वारी कालावधीत महिला वारकरी भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी. एसटी महामंडळामार्फत उभारण्यात येणाऱ्या खाजगी बस स्थानकावर स्वच्छता , मुबलक शौचालय तसेच सुरक्षा व्यवस्था ठेवावी नदीपात्रात धोकादायक ठिकाणी माहिती फलक लावावेत. वारकऱ्यांच्या सुखमय प्रवासासाठी एसटी बसेस तपासणी करून सुस्थितीत असण्याची खात्री करावी

तसेच आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दर्शन रांगेत उभ्या असणाऱ्या भाविकांसाठी दर्शन रांगेत बैठक व्यवस्था मंदिर समितीने करावी. आषाढी एकादशी दिवशी राजगिरा लाडूची संख्या वाढवावी. मुख्य दर्शनी मंडपात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. टोकन दर्शनी व्यवस्था सुरू करण्याबाबत मंदिर समितीने कार्यवाही करावी जेणेकरून वारकरी भाविकांचा दर्शनाचा वेळ वाचेल मंदिर समितीचे जतन व संवर्धनाचे काम सध्या असून उत्खननात सापडलेल्या पुरातन मुर्त्यांची नोंद महसूल प्रशासनाकडे करावी.वारी कालावधी वारकरी भाविकांना प्रशासनाकडून सोयी सुविधा पुरविण्यात येतात यासाठी मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती केली जाते त्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहनही विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद माहिती देताना म्हणाले, आषाढी यात्रा सोहळ्यात वारकऱ्यांना केंद्रबिंदू मानून आषाढी वारीचे पूर्व नियोजन करण्यात आले आहे. आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, पालखी सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वारकरी भाविकांना तात्काळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच सुरक्षेबाबत दक्षता घेण्यासाठी २५ हजार ५०० अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ३४ आपत्ती प्रतिसाद प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे आषाढी वारी सुखकर व निर्विघ्नपार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाकडून पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सुविधेसाठी वॉटरप्रुफ मंडप, महिला कक्ष, चेंजिंग रुम, वैद्यकीय व्यवस्था आदीबाबत माहिती दिली. तर वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक नियोजन केल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सांगितले. यावेळी मंदीर समितीचे सह. अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांच्या सोयी-सुविधांबाबत मंदीर समितीकडून करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. तसेच भाविकांना जलद व सुलभ दर्शन व्हावे याबत नियोजन करण्यात आले असल्याचेही सांगितले.

**हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा

**छत्रपती संभाजी नगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १७ जून १९३८ ला धुळे येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही. तसेच १९ जून १९३८ ला चाळीसगांव येथील सभेत म्हणाले होते की, जो दुसऱ्यावरी विश्र्वासली त्याचा कार्यभाग बुडाला. या संयुक्त विधानाच्या ८६ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ-) आईनाच्या संयुक्त विद्यमाने ५२ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १६ जून २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. महेश खरात म्हणाले की, असंख्य दारिद्र्यात पिचलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी त्या काळात स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केला आहे. ज्या माध्यमातून त्यांनी काही प्रतिनिधी विधीमंडळात पाठविले होते. केवळ राजकारणानेच आपली उन्नती होईल असे नाही तर संघटनेला निष्ठावान माणसाची आवश्यकता आहे. या अनुषंगाने असलेल्या उदासिनतेवर तोडगा काढण्यासाठी काय केले पाहिजे? म्हणजे आपण संघटीत होऊ याचा विचार केला पाहिजे. कालच्या आणि आजच्या समस्या भिन्न आहेत. त्या लक्षात येण्यासाठी समाजाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळावे म्हणून भारताचे संविधानात कलम ४५ प्रमाणे तरतूद केली आहे. राजकारण ही सर्व समस्यांची गुरूकिल्ली आहे. सर्व बदलायचं असेल तर आपण प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

याप्रसंगी एड. विलास रामटेके म्हणाले की, आपली सावली सुद्धा ज्यांना चालत नव्हती, ती माणसे आज सोबत असून त्यांच्या सहकार्याने आपण स्वतंत्र मजूर पक्षाचे १५ प्रतिनिधी निवडून आणले आहेत. त्यामुळे स्वतंत्र मजूर पक्ष हाच तुमचा देव आहे असे बाबासाहेब आंबेडकर तेव्हा म्हणाले होते. तसेच गांधीं चालवीत असलेल्या हरिजन सेवा संघाचे सहकार्य घेतल्यास गुलामी पत्करावी लागली असती म्हणून ते नाकारले आहे. राजकारण हे आपले साध्य नसून साधन आहे. १९०९ ला इंग्रजानी भारताला स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले. तद्वतच संसदीय लोकशाहीवर चर्चा करण्यात आल्याने टिळकांनी बहुसंख्यांक होण्यावर भर दिला. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन नंतर संकल्पित आरपीआय ची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली होती. जो सध्या शत्रूपक्षाच्या दावणीला बांधला आहे. परिणामी दिनाभाना, खापर्डे आणि कांशीराम यांनी संघटीत लढा देण्यासाठी बामसेफ ची निर्मिती केली होती. राहूल मेश्राम म्हणाले की, प्रथम शिक्षण घ्यावे, स्वतःच्या पोटापाण्याचा प्रश्र्न सोडवावे नंतर राजकारण करावे. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद कॉलेज व सिद्धार्थ महाविद्यालय स्थापन केले होते. आपल्या आजोबा पणजोबांना शिक्षण न मिळाल्याने त्यांना प्रगती करता आली नाही. हिंदू म्हणून आपली प्रगती न झाल्याने त्यांनी आपणास वैज्ञानिक दृष्टिकोनातील बुद्ध धम्म दिला आहे. प्रा. मंगला झिने मॅडम म्हणाल्या की, रामदास आठवले यांच्या कडे अनेक वर्षांपासून समाज कल्याण खाते आहे. मात्र त्यांनी समाजाचे कल्याण केल्याचे दिसून येत नाही. लढाऊ नेते गंगाधर गाडे व लाँग मार्च प्रणेते जोगेंद्र कवाडे सारखे नेते पुढे येण्याची आवश्यकता आहे. समस्या जर आपली असेल तर प्रयत्न सुद्धा आपणच केले पाहिजे ज्यामुळे आपली प्रगती होऊ शकेल. साहील पटेल म्हणाले की फोडा आणि राज्य करा या प्रवृत्तीला आपला समाज बळी पडत आहे म्हणून समाज जागृती आवश्यक आहे. मोहसिन पटेल म्हणाले की, शैक्षणिक दृष्ट्या प्रगल्भ होऊन राजकारणात पुढे आल्यास आपणास कुणीही थांबवू शकणार नाही. मागासवर्गीय, शूद्र लोक शिक्षण घेत आहेत. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची देण आहे. ज्यामुळे शूद्रातिशूद्रांची प्रगती होत आहे, याला ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही. पी. के. परदेशी म्हणाले की, वडील आंबेडकरी विचारांचे असल्याने गावातील बहुतांश लोक विरोधात असायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे आपण सुशिक्षित होत आहोत, याचे भान ठेवले पाहिजे. जन्म स्वदेशी पण नाव परदेशी असल्याने बाबासाहेब स्विकारतांना फार किंमत मोजावी लागली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावांवर अनेक बाबी होत आहेत, पण विचारांचे काय? म्हणून विचारांची अंमलबजावणी करून वेगाने पुढे गेले पाहिजे.

प्रमुख वक्ते समाधान इंगळे म्हणाले की, १९९८ ला आपले चार खासदार निवडून आले होते. तर बाबासाहेब आंबेडकरांनी १५ प्रतिनिधी त्या काळात विधिमंडळात पाठविले होते. हा इतिहास लक्षात घेता आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही. असे जरी बाबासाहेब आंबेडकरानी म्हटले असले तरी सद्यस्थितीत आपली वाटचाल शून्याकडे झाली आहे. बराक ओबामा यांनी दोन कालावधी पूर्ण केल्या आहेत.



त्यांच्या यशस्वीते मागील रहस्य समजून घेतले पाहिजे. वाजपेयी, अडवाणी यांनी पंक्चर झालेल्या सायकली ओढत नेऊन यश संपादन केले आहे. स्वकष्टाने पुढे जातो त्याचा कार्यभाग सार्थकी लागतो.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २१ आगष्ट १९५५ ला शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत स्पष्ट केले होते की, केवळ निवडणूका जिंकणे हे राजकीय पक्षाचे अस्तित्व नाही तर त्या राजकीय पक्षाने जनतेला शैक्षणिक जागृत करून संघटीत होण्यासाठी संघर्ष करायला तयार केले पाहिजे. जेणेकरून आपल्या ऐक्याच्या बळावर बहुसंख्यांकांचे राज्य स्थापन करता येईल. हे लक्षात घेऊन सामाजिक जाणिवेतून दिनाभाना, डी. के. खापर्डे, कांशीराम सारख्या जानकार मंडळीनी ६ डिसेंबर १९७८ ला बामसेफ या सामाजिक संघटनेची स्थापना केली होती. पुढे त्यांनी १९८१ ला समाजाच्या प्रश्र्नांवर संघर्ष करण्यासाठी डीएसफोर म्हणजे दलित सोशित समाज संघर्ष समिती स्थापन केली होती. डीएसफोर ला देशात मिळालेल्या समर्थनाचा विचार करून १४ एप्रिल १९८४ ला बहुजन समाज पक्षाची स्थापना करण्यात आली. ज्यांनी स्वबळावर आणि इतरांच्या सहकार्याने उत्तर प्रदेश सारख्या राज्यातील अनेकदा सत्ता काबीज केली होती. हा इतिहास असला तरी सद्यस्थितीत त्यांची वाटचाल शून्याकडे झाली असल्याचे आलेल्या परिणामावरून सिद्ध झाले आहे. तसेच आरपीआय सह इतरही राजकीय पक्षांची स्थिती काही वेगळी नाही. तर मग बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही. असा संदेश दिला होता. त्या मर्मभेदी संदेशाला अनुयायी का समजू शकले नाहीत? हा प्रश्र्न अनुत्तरित आहे. करिता या ज्वलंत विषयावर जाणीव जागृती व्हावी म्हणून कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. पँथर नेते गंगाधर गाडे, लाँग मार्च प्रणेते जोगेंद्र कवाडे यांनी १७ वर्षे एवढा दीर्घकाळ लढा देऊन विद्यापीठाचा नामविस्तार घडवून आणला. असा इतिहास असला तरी त्या काळात मान्यवर कांशीराम यांनी आप्रेस्ड इंडियन या मासिकात हू लिड लाँगमार्च? असा प्रश्र्न उपस्थित करून बहुजनांचे आंदोलन शत्रूपक्षाने हायजॅक केले होते का? याची साशंकता व्यक्त केली आहे. तसेच वर्तमान काळातही तसेच घडत आहे काय? ज्यामुळे राजकीय पक्षांचे अस्तित्व नामशेष होत चालले आहे. याचा विचार करून बहुजन आंदोलनाची होत चाललेली वाताहात, अधोगती थांबविण्यासाठी समाजातील सुशिक्षित हितचिंतकांनी आपली भूमिका पार पाडली पाहिजे. तर मग आपले प्रतिनिधी विधीमंडळात पाठवायला ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाहीत.

जसे १७ वर्षे आंदोलन केल्यावर, अनेकांनी बलिदान दिल्यावर एका विद्यापीठाचा नामविस्तार करण्यात आला. तर दुसरीकडे सत्ता असल्यावर अनेक शहरांचे, जिल्ह्यांचे, विद्यापीठांचे, संस्थांचे नामकरण कसे केले जाऊ शकते? हे उत्तर प्रदेश राज्यातील सत्ता संपादनाने इतिहास काळात सिद्ध केले आहे. मात्र हे करण्यासाठी जनतेचे जनमत घडवून आणावे लागते म्हणून स्वतंत्र मेडिया चालवावा लागत असतो. ते कार्य मात्र कुणीही पार पाडताना दिसत नाही. उलटपक्षी थोड्याफार प्रमाणात ज्यांनी सुरूवात केली होती, त्यांनी सुद्धा बहुतेक प्रसार माध्यमे बंद केल्याने त्यांच्या प्रगतीला उतरती कळा लागली. परिणामी त्यांना दुसऱ्यावर परावलंबी व्हावे लागले. त्यामुळे जो दुसऱ्यावरी विश्र्वासला त्याचा कार्यभाग बुडाला. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चाळीसगांव येथील सभेत १९ जून १९३८ ला म्हणाले होते. ते साकार करण्यासाठी बहुजन आंदोलनाने कार्य केल्याची प्रचिती वर्तमानातील स्थितीवरून सिद्ध झाले आहे. करिता आपण वर्तमानपत्रे वाचताना दोन ओळीतील आणि प्रत्येक ओळी मागील अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. तसे करीत असताना प्रथमतः परिवर्तनवादी विचारांची वृत्तपत्रे वाचावीत. आणि वेळ मिळालाच तर इतरही वृत्तपत्रे वाचावीत. अशाप्रकारे परिवर्तनवादी विचारांच्या प्रचार प्रसार माध्यमांना पटलावर आणण्याचे कार्य आपण गतिमान केले तर मग सर्व क्षेत्रातील आपल्या प्रगतीला, अर्थात समाजाच्या, देशाच्या प्रगतीला कुणीही थांबवू शकणार नाही. करिता भारताचे संविधानाला अपेक्षित मेडियाची भरभराट आणि उत्कर्ष होण्यासाठी आपण आपले योगदान अदा करुया.

या कार्यशाळेला एड. विलास रामटेके, राहूल मेश्राम, एस. ओ. इंगळे, एड. महेश खरात, प्रा. मंगला झिने, बी. बी. मेश्राम, साहील पटेल, पी. के. परदेशी, मोहसिन पटेल इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## श्री एस.जी.परमशेट्टी प्रशालेत जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात संपन्न



**दुधनी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी सुरुवातीला नागराज कलबुर्गी यांनी योग दिनाचे महत्त्व योग का करायला पाहिजे योगाचे महत्त्व काय योग कोठून सुरुवात झाली व योगासनांचे फायदे काय आहेत असे अनेक प्रकारची माहिती देवून प्रात्यक्षिकही करून दाखवले .या योगासनात सूर्यनमस्कार अनुलोम-विलोम कपालभाती ब्राह्मरी चक्रासन ताडासन भुजंगासन हास्यासन शवासन यासह अनेक सूक्ष्म हालचाली योगासन प्राणायाम प्रात्यक्षिक करून सर्व विद्यार्थी व शिक्षकांकडून देखील करवून घेतले या योग दिनात शिक्षक बंधू-भगिनी विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते सकाळी आठ पासून दहा पर्यंत हा योग दिन प्रात्यक्षिकद्वारे संपन्न झाला या सर्व प्रकारची माहिती व प्रोत्साहन क्रीडा शिक्षक दत्तात्रय हिळळी व नागराज कलबुर्गी यांनी सर्वांना माहिती देऊन प्रात्यक्षिक करून दाखवले यामुळे सर्व विद्यार्थी पालक शिक्षक मोठ्या उत्साहात सहभाग झाले होते याप्रसंगी मुख्याध्यापक रेवणसिद्ध अलीगावे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी ज्येष्ठ शिक्षक परमेश्र्वर कोळी सिद्धाराम नुला चंद्रशेखर खंडाळा राजशेखर पाटील सुरेश बिराजदार महानिंग सोमेश्र्वर मल्लय्या स्वामी खाजपा शिंगे सातलिंग गुळगोंडा अविनाश भैरणगी गिरीश गाडी सौ नागदेवी स्वामी प्रियांका पावली लक्ष्मी मेत्रे श्रुती दिवटे महादेवी कोरे पार्वती हिरेमठ उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवक देशुराव राठोड भीमाशंकर सुणगार महादेव हंगरगी यांनी परिश्रम घेतले यावेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते योग दिन उत्कृष्ट पार पडल्याबद्दल मुख्याध्यापक पर्यवेक्षक यांनी अभिनंदन केले सर्व मान्यवर आभार क्रीडा प्रमुख दत्तात्रय यांनी मानले .

## सुपरस्टार फॅमिली ग्रुप व विश्वनाथ घोदे यांच्याकडून जि.प.प्राथमिक कन्नड शिरवळवाडी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या व बॅग वाटप

**अक्कलकोट / हणमंत घोदे**

दिनांक २२ जून २०२४ रोजी अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा शिरवळवाडी येथील इयत्ता पहिली ते सातवी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सुपरस्टार फॅमिली कडून वह्या व श्री विश्र्वनाथ घोदे यांच्याकडून दरवर्षी प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून प्रत्येक वर्षी सुपरस्टार फॅमिली कडून विद्यार्थ्यांना वह्या वाटप केल्या जातात व शैक्षाणिक वर्ष २०१२ पासून विश्र्वनाथ परमेश्र्वर घोदे कडून शालेय बॅग व वह्या वाटप करण्यात येतो. यंदाही सुपरस्टार फॅमिलीचे अध्यक्ष श्री सिद्धाराम चौधरी सर ,उपाध्यक्ष श्री महेश हत्तरके ,मारुती हन्नुरे पोलीस, चन्नवीर स्वामी,प्रदीप वडगाव , नागनाथ शिरगापुरे, शंकर स्वामी ,श्रीकांत हन्नुरे



व या मित्रमंडळी सुपरस्टार फॅमिली या माध्यमातून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटपचा कार्यक्रम हाती घेतले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शिवराज हत्तरकी होते. या प्रसंगी केन्द्र प्रमुख श्री बसवराज मुनोळी, श्री हणमंत घोदे, श्री इरण्णा घोदे, श्री श्रीशैल घोदे, पोलीस पाटील श्री प्रदीप वडगांव, श्री धानय्या स्वामी आदी उपस्थित होते.कन्नड शाळेत शिकून आम्ही सर्वजण आज मोठे पदावर आहोत. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने आम्हाला पुढील शिक्षणात खूप मदत झाली आणि यापुढे सुद्धा सदर शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थी मोठे पदावर जावे या सदिच्छाने दरवर्षी आम्ही वह्या वाटप चा कार्यक्रम हाती घेतो असे सुपर स्टार फॅमिली अध्यक्ष श्री सिद्धराम चौधरी सर यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले.केंद्र प्रमुख साहेबांनी सुपरस्टार ग्रूपचे सदस्याचे व विश्र्वनाथ घोदे यांचे आभार मानले. मुख्याध्यापक श्री अशोक कोगनुरे सरांनी आपण दिलेल्या साहित्याची योग्य वापर करून मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची शंभर टक्के प्रयत्न करु अशी आश्र्वासन व्यक्त केले.या वेळी मुख्याध्यापक श्री अशोक कोगनुरे, शिक्षक वृंद श्री भीमाशंकर बजे ,श्री रमेश घोदे उपस्थित होत. शाळेकडून सर्वांचे यथोचित सत्कार करण्यात आले. श्री भीमाशंकर बजे सर सूत्र संचालन व श्री रमेश घोदे यांनी आभार प्रदर्शन केले.

## देऊळगाव राजा येथील राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**कैलास आंधळे / मेरा बुद्रुक**

करो योग रहो निरोग जागतिक योग दिनानिमित्त देऊळगाव राजा येथील राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये प्रत्येकाची आरोग्य समस्या अधिक जटील होत चाललेली आहे.त्यामुळे मानवी जीवनातील आनंद,सुख,शांती,हरवत चालल्याचे चित्र दिसत आहे.भौतिक सुखाच्या पाठीमागे धावताना आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होतांना दिसते आहे. प्रत्येकाच्या आरोग्याचे संवर्धन होऊन प्रत्येकाला निरामय जीवन व दीर्घायुष्य लाभावं यासाठी योगमय जीवनशैली अंगीकारणे महत्त्वाचे आहे.यासाठीच प्रत्येकाने दररोज योग- प्राणायाम,ध्यान,साधना करणे महत्त्वाचे आहे. दहाव्या जागतिक योग दिनाच्या निमित्ताने सालाबादाप्रमाणे याही वर्षी एक दिवशीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले यावेळी सकाळी आठ वाजता राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांना स्कूलच्या शिक्षिका पल्लवी संत यांनी विद्यार्थ्यांना योगाचे मार्गदर्शन करून योगाचे पाठ देण्यात आले विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या योगाभ्यास प्रशिक्षणाला प्रतिसाद दिला. यावेळी राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल च्या अध्यक्षा मीनलताई शेळके ,सचिव डॉक्टर रामप्रसाद शेळके, सीईओ सुजित गुप्ता,अकॅडमीक हेड डॉक्टर प्रियांका देशमुख,फैजल उस्मानी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीना निर्मल मॅडम यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

